# जिल्हा परिषद,रत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेबआंबेडकर भवन,
पहिला मजला,रत्नागिरी,415612.

## पशुसंवर्धन विभाग

दूरध्वनीक्र.02352-350715 ई-मेल-dahoratnagiri@gmail.com


पशुधन हिताय:बहुजन सुखाय:

जा.क्र.रजिप/पसंवि/कार्या-१/५२० /२०२४ (१७३६) दिनांक:- १२.०३.२०२४

**वाचले -**

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ नियमावली व त्यामधील परिशिष्ट दोन
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अनिओ/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५
३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. २०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि. २१.१०.२०२२
४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.२०/२०२२/ आ.पु.क. दि. ३१.१०.२०२२
५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५.११.२०२२
६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, यांचे शासन निर्णय क्र. प्रानिमं/१२२२/प्र.क्र.१३६/का-१३/ब दि.२१.११.२२
७) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८. दि १५.५.२०२३
८) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी यांजकडील मंजूर निवड यादी.
९) कार्यालयीन मंजूर टिप्पणी दिनांक- ११.०३.२०२४

**आदेश -**

मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती रत्नागिरी यांनी जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत पशुधन पर्यवेक्षक जिल्हा सेवा वर्ग तीन (दुय्यम पशुसंवर्धन) पदांसाठी निवड केलेल्या खालील नमूद उमेदवारास पशुधन पर्यवेक्षक म्हणून जिल्हा सेवा (वर्ग ३) या पदावर **वेतन मॅट्रीक्स एस-८:२५५००-८११०० या** वेतन श्रेणीत वेतन आणि प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय भत्ते यासह त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | उमेदवाराचा सामाजिक प्रवर्ग | निवडीचा सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.पदमज शिवाजीराव शिंदे | EWS | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना मालगुंड, ता.रत्नागिरी |
| २ | श्री.सुनील रगंराव ढेंगे | EWS | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना मिळंद, ता.राजापूर |
| ३ | श्री.माधव सभाजी पवार | EWS | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना कारुळ, ता.गुहागर |
| ४ | श्री.विजय प्रदिप पिसाळ | खुला | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना वाकवली, ता.दापोली |
| ५ | श्री.युवराज आनंदराव उबाळे | EWS | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना किंजळे, ता.खेड |
| ६ | श्री.अनिकेत सुरेश भिलवडे | खुला | खुला समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना नांदगांव, ता.चिपळूण |
| ७ | श्रीम.स्वप्नाली शांताराम तांबे | अनु.जाती | खुला महिला आरक्षणा | पंचायत समिती राजापूर , ता.राजापूर |
| ८ | श्रीम.मनिषा वसंत खाडे | भ.ज.ड | खुला महिला आरक्षणा | पशु.वै.दवाखाना पाचल, ता.राजापूर |
| ९ | श्रीम.अश्विनी यदुराज भाकरे | भ.ज.क. | खुला महिला आरक्षणा | पंचायत समिती संगमेश्वर (देवरुख), ता. संगमेश्वर |
| १० | श्रीम.ज्योती मानसिंग कांबळे | अनु.जाती | खुला महिला आरक्षणा | पंचायत समिती लांजा, ता. लांजा |
| ११ | श्रीम.सुजाता सुधाकर पवार | विजाअ | खुला महिला आरक्षणा | पंचायत समिती खेड, ता. खेड |
| १२ | श्री.पंकजकुमार निरंजन गांवडे | अनु.जाती | खुला (खेळाडू) | पशु.वै.दवाखाना जाकादेवी , ता.रत्नागिरी |
| १३ | श्री.युवराज गजानन आसवले | EWS | खुला (माजी सैनिक) | पशु.वै.दवाखाना रिगंणे, ता.लांजा |
| १४ | श्री.ओमकार शरदचंद्र कागणे | भ.ज.ड | खुला (प्रकल्प ग्रस्त ) | पशु.वै.दवाखाना लाटवण, ता.मंडणगड |
| १५ | श्री.रावसाहेब काशिनाथ भोरे | EWS | खुला (अंशकालीन कर्मचारी ) | पशु.वै.दवाखाना पडवे, ता.गुहागर |
| १६ | श्री.वैभव सुभाष चव्हाण | विजाअ | खुला दिव्यांग | पशु.वै.दवाखाना दाभिळ, ता.दापोली |

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | उमेदवाराचा सामाजिक प्रवर्ग | निवडीचा सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षण | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १७ | श्री.कपिल देविदासराव गायकवाड | अनु.जाती | अनु.जाती समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना खोपी, ता.खेड |
| १८ | श्री.भागवत साहेबराव शिंदे | अनु.जाती | अनु.जाती समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना जामगे, ता.खेड |
| १९ | श्रीम.निकिता अनिल पवार | अनु.जाती | अनु.जाती (महिला) | पंचायत समिती रत्नागिरी,ता.रत्नागिरी |
| २० | श्रीम.राजश्री भीमराव सावळे | अनु.जाती | अनु.जाती (महिला) | पशु.वै.दवाखाना घोडवली, ता.संगमेश्वर |
| २१ | श्री.आकाश ईश्वर डोंगरे | अनु.जाती | अनु.जाती (अंशकालीन कर्मचारी) | पंचायत समिती दापोली, ता.दापोली |
| २२ | श्री.शिवशंकर बापूराव चाकोटे | अनु.जमाती | अनु.जमाती समांतर आरक्षणा विरहित | पंचायत समिती गुहागर, ता.गुहागर |
| २३ | श्री.संतोष नामदेव खरोडे | अनु.जमाती | अनु.जमाती समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना कापरे, ता.चिपळूण |
| २४ | श्रीम.मीना गंगाधर मजलकर | अनु.जमाती | अनु.जमाती (महिला) | पशु.वै.दवाखाना वेरळ, ता.लांजा |
| २५ | श्री.संजय हिम्मतराव चव्हाण | विजाअ | विजाअ समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना जुवाठी, ता.राजापूर |
| २६ | श्री.मदन कपूरचंद गुसिंगे | विजाअ | विजाअ | पशु.वै.दवाखाना कोंडये, ता.राजापूर |
| २७ | श्री.हरिकिसन हिम्मत धनगर | भजब | भजब समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना देव्हारे, ता.मंडणगड |
| २८ | श्री.सचिन दशरथ डोंगरे | भजड | भजड समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना अणसुरे, ता.राजापूर |
| २९ | श्री.संदिप भास्कर देऊळकर | इमाव | इमाव समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना खानवली, ता.लांजा |
| ३० | श्री.अक्षय विश्वास कातकर | इमाव | इमाव समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना खावडी, ता.लांजा |
| ३१ | श्रीम.रुपाली तुकाराम खंडागळे | इमाव | इमाव (महिला) | पशु.वै.दवाखाना वेरवली, ता.लांजा |
| ३२ | श्री.कल्याण सदाशिव नवले | इमाव | इमाव | पशु.वै.दवाखाना पावस, ता.रत्नागिरी |
| ३३ | श्री.कुणाल राजेंद्र पाटिल | इमाव | इमाव (अंशकालीन कर्मचारी) | पशु.वै.दवाखाना तुरबंव, ता.चिपळूण |
| ३४ | श्री.अतुल एकनाथ पाटिल | EWS | EWS समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना शिपोशी, ता.लांजा |
| ३५ | श्री.सुरज चांगदेव जगताप | EWS | EWS समांतर आरक्षणा विरहित | पशु.वै.दवाखाना माखजन, ता.संगमेश्वर (देवरुख) |
| ३६ | श्रीम.मानसी मोहन लोटणकर | EWS | EWS (महिला) | पंचायत समिती संगमेश्वर (देवरुख) |

**उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीस अधिन राहून करणेत येत आहे.**

१) उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत पदस्थापनेच्या जागी हजर होणेचे आहे. उमेदवार मुदतीच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास नियुक्तीचा हक्क रद्द होईल.

२) पदस्थापनेच्या जागी रुजू होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय रहाणार नाही.

३) सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून, उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.

४) जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची पूर्व सूचना/ नोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचे मुळ वेतन जिल्हा निधीत जमा करुन राजीनामा मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

५) सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपात असून पद कोणत्याही कारणास्तव रद्द अगर व्यपगत झाल्यास तशी नोटीस देवून सेवेतून कमी केले जाईल.

६) हजर होताना नियमानुसार रु. १००/- चे प्रतिज्ञापत्रावर नियुक्ती आदेशातील सर्व अटी मान्य असले बाबत लेखी करारपत्र (ॲग्रीमेंट) संबंधित अधिकारी / कार्यालय प्रमुखांकडे द्यावे लागेल.

७) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचेकडे शारिरिक दृष्ट्या पात्र ठरविण्याच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देणेत येत आहे. सदरचे प्रमाणपत्र सहा महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे.

८) शासनाचे / जिल्हा परिषदेचे वेळोवेळी आदेश / सुचना / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

९) महाराष्ट्र जिल्हा परिषदा (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम १९६७ मधील नियम ६(५) नुसार सदर पदावरील परिविक्षाधिन कालावधी एक वर्षाचा असेल परंतु संबंधित उमेदवाराचे कामकाज सदर परिविक्षा कालावधीत असमाधानकारक असल्याची खात्री झाल्यास नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहतील.

१०) उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील आठ नुसार शासनाने विहित केलेली / वेळोवेळी विहित करील अशा विभागीय परिक्षा / भाषा / प्रशिक्षण अर्हता विहित संधीत व मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक राहील. प्रचलित नियमानुसार विभागीय परिक्षा / व्यावसायीक परिक्षा प्रथम ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

११) संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहिल.

१२) उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलीस अधिक्षक, यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधिन राहिल. या बाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

१३) संबंधित उमेदवारास शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३१.१०.२००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल. तसेच सेवा निवृत्ती अंशराशीकरण, भविष्य निर्वाह निधी इत्यादी संबंधित शासनाचे वेळोवेळी आदेश, निर्णय, परिपत्रक इत्यादीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

१४) नियुक्ती करीता सादर केलेल्या कागदपत्राच्या/ प्रमाणपत्राच्या अनुषंगाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्ती बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर व कोणत्याही वेळी रद्द करणेत येईल.

१५) साप्रवि कडील शासन परिपत्रक दिनांक २८ मार्च २००५ व परिपत्रक क्र. एसआरव्ही२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतीज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

१६) पशुधन पर्यवेक्षक पदांचे संदर्भित जिल्हा परिषद जिल्हा सेवा (प्रवेश) नियम १९६७ नुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेबाबत, तांत्रीक व प्रशासकीय कामकाजाचे पुनर्विलोकन तीन व सहा महिन्यानंतर विभागपमुखांमार्फत करणेत येईल. त्यामध्ये अनर्हता किंवा असमाधानकारक कामकाज असलेची खात्री झाल्यास सक्षम प्राधिकारी / तथा नियुक्ती प्राधिकारी संबंधित उमेदवारास जिल्हा परिषद सेवेतून कमी करणे किंवा पदावनत करणेबाबत योग्य तो निर्णय घेणेस सक्षम असतील.

१७) नियुक्तीचे ठिकाणाबाबत, पदस्थापना नियुक्ती बदलून मिळणेबाबत अथवा कामकाजाबाबत बाह्य हस्तक्षेप आणल्यास नियुक्ती रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१८) मागास प्रवर्गातील उमेदवारांना त्याची जात प्रमाणपत्राची वैधता सहा महिन्याच्याआत जात पडताळणी समितीकडून पडताळणी करणे बंधनकारक राहील.( सा.प्र.वि. कडील शा.नि. दि. १२.१२.२०११)

१९) महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) प्रवेश नियम १९६७ मधील नियम ६(६) अन्वये उमेदवाराने एक वर्षापेक्षा कमी नसेल इतकी सेवा अखंड मुदतीसाठी या पदावर समाधानकारकरित्या सेवा केल्यास किंवा परिविक्षेची मुदत समाधानकारकरित्या पूर्ण केली असेल आणि विभागीय परिक्षा किंवा इतर कोणतीही असल्यास, भाषा परिक्षा उत्तीर्ण झाली असेल तो किंवा ते पद धारण करण्याकरिता शासनाने ठरविलेले (असल्यास) प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय जिल्हा सेवेतील पदावर कायम करता येणार नाही.

२०) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी- २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब /दि.१२ डिसेंबर २०११ अन्वये ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांचे जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून सहा महिन्याचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्याचा प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल, व जात पडताळणी समितीने दिलेली पोच पावतीची साक्षांकित प्रत कार्यालयाकडे सादर करावी लागेल. जात पडताळणी समिती ने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (श्रध्दा सावंत) | (एस.गांवखडकर ) | (पांडुरंग काळे ) | (डॉ.आर.पी.नरुटे) | (किर्ती किरण पुजार, भाप्रसे) |
| व.स. | कनि.प्र.अ. | सहा.प्र.अ. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |

प्रति,

----------------------------,

----------------------------

प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवसाठी.

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी.

२) गट विकास अधिकारी -----------------

२/- आदेशात नमूद अटी व शर्तीनुसार पुर्तता करून, उमेदवारांची सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी करुन, अ.क्र.६ नुसार प्रतिज्ञापत्र घेवून रुजू व हजर अहवाल या कार्यालयाकडे उलट टपाली सादर करावा. सदर उमेदवार विहित मुदतीत हजर न झाल्यास तसेही कळवावे.

३) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) / पशु.वै.दवाखाना ,ता.

४) आस्था -२

५) संकलन नस्ती साप्रवि.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (श्रध्दा सावंत) | (एस.गांवखडकर ) | (पांडुरंग काळे ) | (डॉ.आर.पी.नरुटे) | (किर्ती किरण पुजार, भाप्रसे) |
| व.स. | क.प्र.अ. | स.प्र.अ. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |